# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

## ४१२, ई, शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

☎ २५६५६२३४, फॅक्स २५६५६२३४, E-mail : jdtepu@pn3.vsnl.net.in

**स्मरणपत्र-1**

जा.क्र.तंशिविकापु/आस्था-2/मा.अ./2011/ 8662 दिनांक :- 6 AUG 2011

प्रति,

सर्व संस्था प्रमुख / प्राचार्य,
विनाअनुदानित अभियांत्रिकी व औषधनिर्माण पदविका संस्था,
पुणे विभाग

**विषय : विनाअनुदानित तंत्रनिकेतनातील कर्मचा-यांच्या विविध समस्यांबाबत.**
संदर्भ : या कार्यालयाचे संकेत स्थळावर प्रदर्शित केलेले पत्र क्र.
विकापु/आस्था-2/माहिती/2010/11017 दि.18.12.2010

उपरोक्त विषयाचे या कार्यालयाचे संकेत स्थळावर प्रदर्शित केलेले संदर्भाधिन पत्र पहावे. सर्व विनाअनुदानित तंत्रनिकेतनांना सदरील पत्राच्या अनुषंगाने कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले होते. तथापि, आपल्या संस्थेकडून याबाबत काय कार्यवाही करण्यात आली या बाबतचा अहवाल अद्यापपर्यंत प्राप्त झालेला नाही त्याबध्दल खेद व्यक्त करण्यात येत आहे.

तरी सर्व विना अनुदानित संस्था प्रमुखांना कळविण्यांत येते की, सदरील पत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे खालील मुददयांवर कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल दि.16.08.2011 पूर्वी न चुकता या कार्यालयास पाठविण्यात यांवा. ज्या संस्था विहीत कालावधीमध्ये त्यांचा अहवाल पाठविणार नाहीत, त्यांची गुणवत्ता यादी प्रमाणित करुन मिळणार नाही याची त्यांनी नोंद घ्यावी.

1. विना अनुदानित तंत्रनिकेतनामधील प्राध्यापकांना सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीची अंमलबजावणी व फरकाची रक्कम मिळणेबाबत.
2. महाराष्ट्र राज्यातील विना अनुदानित तंत्रनिकेतनांमध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांच्या वेतनासाठी स्वतंत्र खाते अनिवार्य करण्याबाबत.
3. विना अनुदानित तंत्रनिकेतनांमधील कर्मचा-याकरिता ग्रॅच्युइटीची तरतूद करणे संस्था चालकांना अनिवार्य करण्याबाबत.

( डी.एन.शिंगाडे )
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
पुणे

प्रत : श्री.शिंद्रे, प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.